MUCLA Newsletter
Bilingual
Maharashtra University And College Librarians Association
Regd. Under Trade Union Act.1926 Regd No:n.s.k./J-1835, Dt. 03/ 05/ 02014

Vol. 1, Issue 2 MUCLA Newsletter January-March 2021

---

## President Desk

---

नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! कोरोनामुळे २०२० हे वर्ष संपूर्ण जगाकरीता एक दुःखद स्वप्न ठरलं. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि इतर सर्वच स्तरावरील घडी पूर्णपणे विस्कटल्या गेली. आजही ही घडी नीट बसलेली नाही. परंतु सर्वांच्याच इच्छाशक्तीच्या जोरावर आपण सर्वच पूर्वपदावर येण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहोत. ग्रंथालय क्षेत्राकरीता मागील वर्ष दुःखद तसेच प्रेरणादायी घटनांमुळे संमिश्र ठरलं. आपल्या काही व्यवसायिक बंधुंची कोरोना विरुध्दची लढाई अयशस्वी ठरली. या जगाच्या रंगमंचावरील त्यांची एक्झिट मनाला चटका लावून गेली. त्यांच्या या अकाली जाण्याने निश्चितच आपल्या क्षेत्रात कधीही भरुन न निघणारी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची ताकद मिळो ही ईश्वर चरणी प्रार्थना! सर्व मुक्ला सदस्य तसेच ग्रंथपालन क्षेत्रात कार्यरत सर्वांच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

२०२० हे वर्ष आपल्याकरीता प्रेरणादायी याच करीता की, या वर्षात ग्रंथालय क्षेत्रात आपल्या कार्यकर्तव्यामुळे आपली वेगळी प्रतिमा तयार केलेले डॉ. सौ. नमिता खोत, संचालक, ज्ञान स्त्रोत केन्द्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर; डॉ. एस्. ए. एन् इनामदार, निवृत्त ग्रंथपाल, वालचंद कॉलेज, सांगली; आणि डॉ. अनिल चिकाटे, संचालक, ज्ञान स्त्रोत केन्द्र, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव ह्यांना Conference & Awards for Excellence & Leadership in Education च्या माध्यमातून, Most Dynamic Librarian Award ने सन्मानित केल्या गेले. तसेच डॉ. जगदीश कुलकर्णी, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केन्द्र, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना देखील कै. प्रा.बी.आर. थोरात राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल म्हणून प्रभात चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई द्वारे सन्मानित करण्यात आले. ग्रंथालया व्यतिरीक्त इतर क्षेत्रात देखील ग्रंथपाल मागे नाहीत. नुकताच गितांजली वाणी, ग्रंथपाल, देवीप्रसाद गोयन्का मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मेडीया स्टडीज यांना त्यांच्या 'दर्पण' या कविता संग्रहाकरीता फुलोरा – कलेचे माहेर घर या समूहाद्वारे 'साहित्यरत्न' पुरस्कार दिल्या गेला. डॉ. सौ. संगीता धंदर, ग्रंथपाल भगवानबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, लोणार यांचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील विद्यापीठ स्तरीय राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून गौरव करण्यात आला. या सर्व बाबी आपल्या सर्वांकरीता प्रतिष्ठेच्या आणि गर्वाच्या आहेत तर ग्रंथपालन क्षेत्रात नव्याने प्रवेशित ग्रंथपालांना निश्चितच प्रेरणादायी आहेत. या शिवाय डॉ. नारायण बारसे, ग्रंथपाल,जोशी–बेडेकर कॉलेज, ठाणे यांनी नुकतीच कोकणसारख्या पर्वतीय भागातून वयाची पन्नासवी ओलांडल्यानंतर देखील तब्बल सातशे किलोमीटरचा प्रवास सायकलने केला. या सर्व ग्रंथपालांचे मनापासून अभिनंदन! या घटना वाचल्यानंतर ग्रंथपाल निव्वळ ग्रंथालयापुरताच मर्यादित नसून तो प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने स्वतःला सिध्द करत असल्याचे निदर्शनात येतं.

आपल्या सर्वांना कल्पना आहे की, नुकतेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मध्ये सुधारण करण्याकरीता राज्य शासनाने मा. डॉ. सुखदेव थोरात, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठण केलेले आहे. या कायद्यात सुधारणे करीता उच्च शिक्षणातील सर्व स्टेकहोल्डर्सकडून सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. मुक्ला अध्यक्ष या नात्याने इथे नमूद करु इच्छितो की, मुक्ला ने या संदर्भात काही सुचना समिती सदस्यांकडे व्यक्तीशः पाठविलेल्या आहेत. तसेच पुणे विद्यापीठाच्या संकेत स्थळावरुन देखील पाठविलेल्या आहेत. सर्वप्रथम २०११ मध्ये या कायद्याचा मसुदा प्रसिध्द झाल्यानंतर ग्रंथालय तसेच ग्रंथपालांच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना आपल्या सर्वांच्या सहकार्याने मुक्ला द्वारे सातत्याने पाठविले जात आहेत. सकारात्मक बाब म्हणजे यातील बरेच मुद्दे कायद्यात समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

पुनश्च आपणा सर्वांना
नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



**डॉ. मोहन रा. खेरडे**
अध्यक्ष, मुक्ला